# अंबरनाथ नगरपरिषद,अंबरनाथ

कार्यालय : टिळक पथ, के.बी.रोड, अंबरनाथ (प), ता.अंबरनाथ,जि.ठाणे. पिन कोड-४२१५०१ ता.अंबरनाथ,जि.ठाणे
Wedsite www.ambarnathcouncil.net E-mail chiefofficerambarnath@gmail.com
ambarnathcouncil@gmail.com
Phone No. 0251-2682353 / 18002331106

**अपेंडिक्स डी -१**

जावक क्र.अंनप/नरवि/बां.प./२०२१-२२/७८९/९२०८/८४ दिनांक : ०६/१०/२०२१

प्रति,

**श्री.कुरुमुर्ती नारायण व इतर यांचे कु.मु.प.धा.मे.व्ही.आर.पनवेलकर असो.तर्फे श्री.व्ही.आर.पनवेलकर यांचे कु.मु.प.धा.मे.वाळेकर ॲण्ड सन्स् डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.भूषण अरविंद वाळेकर,**
**द्वारा मे.थोरात ॲण्ड मॅथ्यू असो. अभियंता, अंबरनाथ.**

**विषय : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५.**
**स.नं.४०/२सी, प्लॉट नं.३ मौजे : कोहोज खुंटवली,ता. अंबरनाथ, येथे अंतर्गत सुधारीत बांधकाम करण्याच्या मंजूरी बाबत.**

**संदर्भ : १. आपला दि.३१/०५/२०२१ चा मे.थोरात ॲण्ड मॅथ्यू असो.अभियंता यांचे मार्फत सादर केलेला अर्ज क्र. १३३६२६**
**२. यापूर्वी या कार्यालयाने जा.क्र.अंनप/नरवि/रेखां/१८-१९/१०१५/८८२०/५१ दि.१६/११/२०१८ अन्वये रेखांकनास मंजूरी दिलेली आहे.**
**३. यापूर्वी या कार्यालयाने जा.क्र.अंनप/नरवि/बांप/२०१९-२०/५२५/८९४६/३५ दि.३०/०७/२०१९ अन्वये दिलेली बांधकाम परवानगी.**

वरील संदर्भाधीन अर्जान्वये विषयांकित स.नं.४०/२सी, प्लॉट नं.३ मौजे कोहोज खुंटवली,ता. अंबरनाथ, मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी करीता अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर जागा अंबरनाथ शहराच्या मंजूर विकास योजने प्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट आहे. सदरच्या भुखंडास संदर्भ क्र.०२ अन्वये रेखांकन मंजूरी दिलेली असून, भुखंडास मंजूर अभिन्यासातील १८.०० मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित असून, ६.०० मी.रुंदीचा अस्तित्वातील पोहोच रस्ता उपलब्ध आहे. या जागेवर संदर्भिय पत्र क्र.०३ अन्वये बिल्डींग टाईप अे- लोअर तळमजला + तळमजला + दहा मजले, बिल्डींग टाईप बी- तळमजला पै.+ स्टिल्ट पै.+ दहा मजले, रहिवास वापरा करीता परवानगी दिलेली आहे. आता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार विकासकाने बिल्डींग टाईप अे-लोअर तळमजला + तळमजला + बारा मजले, टाईप बी- (अस्तित्वातील तळमजला पै.+ स्टिल्ट पै.+ सहा मजले, पूर्व मंजूरी नुसार) सात ते बारा मजले, रहिवास वापराकरीता सुधारीत बांधकाम प्रस्तावित केलेले आहे. प्रकरणी पूर्वी मंजूरी दिल्याप्रमाणे भुखंडाच्या सीमांकनास, मालकी हक्कास, रस्त्याच्या स्थितीतस व पार्किंग क्षेत्राच्या अधिन राहून सुधारीत परवानगी विचारात घेण्यात येत आहे.

सबब, विषयांकित प्रकरणातील ६०००.०० चौ.मी.भुखंडामध्ये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या तरतूदीनुसार १३८०.०० चौ.मी. प्रिमियम क्षेत्र, ४२००.०० चौ.मी.टि.डी.आर.क्षेत्र व ५१८१.८५ चौ.मी.ॲनसिलरी क्षेत्रासह एकूण अनुज्ञेय क्षेत्र १७३६१.८५ चौ.मी. पैकी (पुर्व मंजूरी प्रमाणे ११८७६.६६ चौ.मी., अस्तित्वातील तळमजला पै.+ स्टिल्ट पै. + सहा मजल्याचे एकूण क्षेत्र ३५४३.५८ चौ.मी.) १७३४६.६८ चौ.मी. बांधकाम क्षेत्र प्रस्तावित करुन बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि.३१/०५/२०२१ च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधीन राहून तुमच्या मालकीच्या जागेत, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये **बिल्डींग टाईप अे-लोअर तळमजला + तळमजला + बारा मजले, टाईप बी - (अस्तित्वातील तळमजला पै.+ स्टिल्ट पै.+ सहा मजले, पूर्व मंजूरी नुसार) प्रस्तावित सात ते बारा मजले, रहिवास वापराकरीता व क्लब हाऊस**/फिटनेस सेंटर/ड्रायव्हरस् रुम/ वाडे भिंतीच्या इमारतीच्या बांधकामबाबत सुधारीत बांधकाम परवाना / प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**: अटी :**

१. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५१(३) नुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रदान केलेल्या विकास नियंत्रण व जमिन वापर या बाबतचे अधिकारास अधीन राहून ही परवानगी देण्यात येत आहे.

२. नकाशात दाखविल्याप्रमाणे नियोजित इमारतीचा वापर निवासी वापरासाठी करावा व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.

३. महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडील बिनशेतीबाबत दि.५ जानेवारी २०१७ चे अध्यादेश क्र.२ मधील लागू असलेल्या आदेशांचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहील.

४. स्थळदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील, मागील व बाजुची सामासिक अंतरे प्रत्यक्षात जागेवर असली पाहिजेत व त्याखालील जागा कायम खुली ठेवावी. या सामासिक अंतरात सेप्टिक टँक चे बांधकाम करावयाचे झाल्यास, सदर सेप्टिक टँक चा स्लॅब सभोवतालच्या फ्लोरींगशी एकपातळी असावा जेणेकरुन वाहतूक व्यवस्थेला बाधा होणार नाही. कोणत्याही बांधकामामुळे तळमजल्याची सामासिक अंतरे कमी होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

५. सदर परवानगी कोव्हिड-१९ विषाणूच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना संदर्भात राज्य शासनाच्या दि.१७/०४/२०२०, २०/०४/२०२०, ०२/०५/२०२०, ०३/०५/२०२० आणि १९/०५/२०२० आणि या अधिसुचनांच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी,ठाणे यांनी आता पर्यंत वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक निर्देशांना अनुसरुन देण्यात येत आहे. यापूढे शासनाच्या कोव्हिड -१९ बाबतच्या धोरणात बदल झाल्यास त्यानुसार पारित होणारे सर्व निर्देश या परवानगीच्या अंमलबजावणीस लागू असतील. शासनाच्या अथवा जिल्हाधिकारी यांच्या कोणत्याही निर्देशाने बांधकाम बंद करण्याचे निर्देश पारित झाल्यास बांधकाम बंद केली जाण्याची तारीख आणि शासन बांधकाम सुरु करण्यास जो आदेश देईल, त्या आदेशाची तारीख या मधील कालावधी हा बांधकाम पुर्ण करण्याच्या कालमर्यादेबाबतच्या अटी विचारात घेतला जाणार नाही. याबबत कुठलाही न्यायालयीन विवाद विकासकाने भविष्यात उपलब्ध करु नये असे केल्यास सदर परवानगी तात्काळ रद्द केली जाईल.

६. सेटबॅक नियमांच्या अंमलबजावणीसाठी मोकळी केलेली / सोडण्यात आलेली जागा ही सार्वजनिक रस्त्याचा भाग समजण्यात येईल.

७. ही बांधकाम परवानगी / प्रारंभ प्रमाणपत्र दिलेल्या तारखेपासून एक वर्ष पर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नूतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशाप्रकारचे नूतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. वैध मुदतीत किमान प्लींथ लेव्हलपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करतांना किंवा नवीन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तित्वात असलेल्या नियमाचा व नियोजित विकास आराखड्याच्या अनुषंगाने छाननी करण्यात येईल.

८. बांधकाम सुरु करण्यापूर्वी नगर भूमापन अधिकारी /भूमी अभिलेख खात्याकडुन जागेची आखणी करुन घेण्यात यावी आणि तसा दाखला नगरपरिषदेकडे सादर केल्यानंतर बांधकाम सुरु करावे.

९. मंजूर नकाशाबाबत जागेवर प्रारंभ प्रमाण पत्राचा क्रमांक /दिनांक आणि इतर माहिती लिहून फलक लावावा.

१०. भूखंडाचे क्षेत्रफळात व हद्दीमध्ये फरक आढळल्यास सुधारीत परवानगी घेणे बंधनकारक राहील. तसेच प्रकरणी प्रस्तावासोबत आपण सादर केलेल्या कागदपत्रांवरुन जागेची मालकी निश्चित केलेली आहे. त्यामुळे जागेच्या मालकी हक्काबाबत / वहीवाटीबाबत वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विकासकर्ता / कु.मु.प.धारक /जमिन मालक यांची राहील.

११. कुलमुखत्यार पत्र धारक / भाडेकरु /गाळेधारक /मुळ मालक यांच्यात काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी वास्तुशिल्पकार / विकासकर्ता यांचेवर राहील.

१२. कुळ कायद्यांची जमिन असल्यास टेनन्सी ॲक्ट कलम ४३ प्रमाणे मा.जिल्हाधिकारी,ठाणे यांची मंजूरी घेतल्याशिवाय बांधकाम करु नये.

१३. प्रस्तावा सोबत सादर केलेले ७/१२ उतारे, फेरफार उतारे, मोजणी नकाशा, कुळमुखत्यार पत्राच्या आधारे सदरहू बांधकाम परवानगी देण्यात आलेली असून ती बनावट किंवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास ही बांधकाम परवानगी संपुष्टात येईल.

१४. बांधकाम सुरु करण्यापूर्वी इमारतीच्या पाया उत्खननासाठी आवश्यक असलेल्या गौण खनिजाचे स्वामित्वधन जिल्हाधिकारी कार्यालयात भरणे आवश्यक असल्यास तसा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

१५. जागेत जुने भाडेकरु असल्यास त्याच्या बाबत योग्य ती व्यवस्था करावयाची जबाबदारी मालकाची राहील व मालक भाडेकरु यामध्ये काही वाद असल्यास किंवा निर्माण झाल्यास त्याचे निवारण मालकाने करणे आवश्यक राहील व त्याबाबतीत नगरपरिषद जबाबदार राहणार नाही.

१६. मंजूर नकाशानुसार बांधकाम न करणे तसेच प्रचलीत विकास नियंत्रण नियमावलीनुसार आवश्यक त्या परवानग्या न घेता बांधकाम / वापर करणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ५२ अनुसार दखलपात्र गुन्हा आहे. त्यामुळे मंजूर बांधकाम परवानगीच्या विपरीत बांधकाम करण्यापूर्वी अथवा मंजूर परवानगीच्या अनुषंगाने बांधकामात फेरफार करण्यापूर्वी सुधारीत बांधकाम परवानगी घेणे आवश्यक राहील.

१७. बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटी प्रमाणे करावे. जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यानंतर मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्याबाबतचे वास्तुशिल्पकाराचे प्रमाणपत्र नगरपरिषदेस सादर करण्यात यावे त्यानंतरच पुढील बांधकाम सुरु करावे.

१८. बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस अधी नगरपरिषद कार्यालयास लेखी कळविण्यात यावे व ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमिनी व्यतिरिक्त इतर जमिनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

१९. विषयाधिन जागेवरील बांधकाम करतांना आय एस १३९२०-१९९३ भुकंपरोधक आर.सी.सी.डिझाईननुसार बांधकाम घटकांचे नियोजन अर्हताप्राप्त नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडून करुन घेणे आवश्यक असून त्यांचे देखरेखीखाली नियोजित इमारतींचे बांधकाम पूर्ण करणे अर्जदार / विकासकर्ता यांचेवर बंधनकारक राहील. इमारतीच्या बांधकाम सुरक्षिततेची (Structural Safety) जबाबदारी सर्वस्वी आपल्या स्थापत्य विशारद / स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेवर राहील.

२०. सांडपाण्याचे व पागोळ्यांचे पाणी नगरपरिषदेच्या गटारीस स्वखर्चाने नगरपरिषद अभियंता यांचे पसंतीप्रमाणे सोडावे लागेल सांडपाण्याच्या बाबतीत आरोग्य खात्याचे प्रमाणपत्र असल्याशिवाय वापर परवाना देण्यात येणार नाही.

२१. सदर प्रकल्पातील घनकचऱ्याची विल्हेवाट सुरक्षितपणे लावण्यासाठी योग्य ती व्यवस्था विकासकांनी / सहकारी गृहनिर्माण संस्थेनी स्वतःच्या जबाबदारीवर करणे आवश्यक राहील. घनकचरा व्यवस्थापनासाठी ओला कचरा / सुका कचरा स्वतंत्रपणे ठेवण्याची, त्याचा साठा व प्रक्रीया करण्याची व त्याकरीता संयंत्र उभारण्याची जबाबदारी विकासकाची / सहकारी गृहनिर्माण संस्थेची राहील.

२२. नवीन इमारतीस मंजूर नकाशा प्रमाणे सेप्टिक टँक पाहिजे व मलनिःस्सारण नलिका भविष्य काळात जवळच्या मलनिःस्सारण नलिकेस स्वखर्चाने नगरपरिषद अभियंता यांचे परवानगीने जोडणे आवश्यक राहील.

२३. उक्त जमीनीवर विकास करतांना जागेवरील भूपृष्ठ रचनेत अनावश्यक बदल करु नये व सदर जागेतून पाण्याचा नैसर्गिक निचरा होत असल्यास तो इकडील परवानगी शिवाय वळवू अथवा बंद करु नये.

२४. बांधकाम परवानगी नियोजित रस्त्याप्रमाणे दिली असल्यास त्या रस्त्यचे काम नगरपरिषदेच्या सोयीप्रमाणे व प्राधान्यतेप्रमाणे केले जाईल तसा रस्ता होईपावेतो इमारकतीकडे जाण्यायेण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहील.

२५. नागरी जमिन कमाल धारणा अधिनियम १९७६ मधील तरतुदी प्रमाणे जागा बाधीत होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहील.

२६. जागेतून किंवा जागे जवळून अतिदाब विद्युतवाहिनी जात असल्यास बांधकाम करण्यापूर्वी संबंधित खात्याकडून ना हरकत दाखला घेतला पाहिजे. तसेच अशा विद्युतवाहिनीपासून सुरक्षित अंतर ठेवले जाईल याची खबरदारी घेण्याची जबाबदारी विकासकाची राहील.

२७. जागा महामार्ग किंवा रेल्वे मार्गास सन्मुख लागून किंवा जवळ असल्यास संबंधित खात्याकडून बांधकाम करण्यापूर्वी ना हरकत दाखला घेतला पाहिजे.

२८. बांधकामाच्या सभोवताली सोडलेल्या खुल्या जागेत कमीत कमी १) अशोक, २) गुलमोहर, ३) निलगिरी, ४) करंज, ५) आंबा, इ.पैकी एकूण दहा झाडे लावून त्यांची जोपासना केली पाहिजे तसेच सध्या अस्तित्वात असलेली झाडे तोडण्यापूर्वी परवानगी घेणे बंधनकारक आहे.

२९. ५०० चौ.मी. वरील भूखंडास नैसर्गिक पावसाळी पाण्याचा पुनर्वापर करणेसाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग (Rain water harvesting) ची यंत्रणा उभारण्यात यावी. तसेच रुफ टॉपचे पावसाळी पाणी जमिनीमध्ये जिरेल अशा पध्दतीने खड्डा घेवून पाईप व्यवस्था करणेत यावी. जेणेकरुन पावसाचे पाणी वाहून वाया जाणार नाही व ते जमिनीमध्ये मुरेल. बांधकाम पूर्णतेचा दाखला सादर करतेवेळी सदर योजना राबविल्या बाबत त्याचे फोटो व ज्या अभिकर्ता (ऐजन्सी) मार्फत ही योजना तयार करण्यात आली आहे. त्यांचेकडील, योजना सुस्थितीत असले बाबत प्रमाणपत्र जोडावे त्याशिवाय बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. सदर यंत्रणा भविष्यात निष्कीय किंवा निकामी झाल्यास, इमारतीच्या प्रत्येक १०० चौ.मी. बांधकाम क्षेत्रासाठी रु.१०००/- प्रतीवर्ष दंड होऊ शकतो.

३०. इमारतीसाठी बसविली जाणारी लिफ्ट हि ISI मार्क असलेली दर्जेदार व नामांकित कंपनीची असावी. लिफ्टच्या सुरक्षिततेच्या संदर्भात संबंधित सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घ्यावी. तसेच तिची भविष्यात वेळोवेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करण्यात यावी. तसेच लिफ्ट ला पॉवर बॅक अप असावा.

३१. सदर इमारत बांधकामामुळे काही वृक्ष बाधीत होत असल्यास वृक्ष अधिकारी यांची विहीत पध्दतीने परवाना प्राप्त करुन त्यांचे आदेशाप्रमाणेच वृक्षतोडीनंतर इमारत बांधकाम हाती घेण्याची कार्यवाही करावी.

३२. बांधकाम साहित्यात फ्लाय ॲश विटा व फ्लाय ॲश आधारीत साहित्याचा वापर करण्यासाठी केंद्र शासनाच्या नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. याबाबत वास्तुविशारदाचे प्रमाणपत्र सादर न केल्यास इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

३३. बांधकाम पूर्ण झाल्यावर पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन मिळण्याकरीता नगरपरिषदेवर जबाबदारी राहणार नाही किंवा पिण्याच्या पाण्यासाठी नगरपरिषद हमी घेणार नाही.तसेच बांधकाम करण्यासाठी पिण्याचे पाणी अजिबात वापरु नये.

३४. बांधकाम पुर्णतेचा दाखला / वापर परवानगी घेतल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये. त्यासाठी जागेवर ज्याप्रमाणे बांधकाम पुर्ण झाले आहे त्याचा नकाशा वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांच्या मार्फत विकास नियंत्रण नियमावलीतील अपेंडिक्स-जी मध्ये आवेदकाने पूर्ण झालेल्या बांधकामाच्या पाच प्रतींसह व इतर आवश्यक कागदपत्रांसह सादर करण्यात यावा. वापर प्रमाणपत्राशिवाय इमारतीचा वापर सुरु केल्यास संपूर्ण इमारत अनधिकृत ठरविली जाईल.

३५. बांधकामाचे मटेरीयल रस्त्यावर टाकावयाचे झाल्यास बाधंकाम खात्याची परवानगी घेणे आवश्यक राहील, त्याकरीता नियमाप्रमाणे लागणारी रक्कम (व दंड झाल्यास त्या रकमेसहीत ) भरावी लागेल. बांधकामाच्या वेळी निरुपयोगी माल (मटेरियल) नगरपरिषद सांगेल त्या ठिकाणी स्वखर्चाने वाहून टाकला पाहिजे.

३६. भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यापूर्वी मा.संचालक, अग्निशमन सेवा, महाराष्ट्र राज्य यांचा ना हरकत दाखला घेणे आपणांवर बंधनकारक राहील.तसेच प्रत्येक मजला व प्रत्येक विंग मध्ये फायर **एक्स्टींग्विशर** बसवावे.

३७. स्टील्टची कमाल उंची नियमानुसार असावी व ती चाहूबाजूने खुली असावी व ती कोणत्याही परिस्थितीत बंदीस्त करु नये.

३८. शासन निर्णयानुसार इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणाकरी उपकर अधिनियम १९९६ अंतर्गत इमारत बांधकामाच्या मुल्यावर १% उपकर नगरपरिषदेमार्फत भरणे आपणांस बंधनकारक आहे. अन्यथा दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.

३९. बांधकाम नकाशात खिडकीबाहेर /बाल्कनी लगत दाखविलेले आर्किटेक्चरल प्रोजेक्शन / कॉर्निस / इलेवेशनल प्रोजेक्शन हे कोणत्याही परिस्थितीत रेलिंग किंवा पॅरापेट वॉल ने बंदिस्त करु नये अथवा वापरात आणण्यायोग्य करु नये. अन्यथा भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणार नाही व सदरचे क्षेत्र बांधकाम क्षेत्रात गणले जाईल.

४०. सदर जागेत माथेरान इको सेंसेटिव्ह तसेच महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ चे कलम २२ अ व ६ च्या तरतुदी लागू झाल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

४१. स्टँप पेपरवर स्टँप नं. ---------------, दि. / / रोजी बंधपत्र लिहून दिल्याप्रमाणे मूळ जमिन मालकास ते बंधनकारक राहील. त्यास नगरपालिका जबाबदार राहणार नाही.

४२. कामगार विभागाने निर्गमित केलेल्या नियम / परिपत्रक/प्रचलित आदेश यांची जमिन मालक /विकासक यांनी पुर्तता करणे बंधनकारक राहील. बांधकाम करतांना कामगारांच्या व लगतच्या वहीवाटदारांच्या सुरक्षिततेची पूर्ण जबाबदारी संबंधित विकासक यांची राहील.

४३. सांडपाण्यावर प्रक्रिया करुन व शुध्दीकरण करुन पाण्याचा पुनर्वापर प्रकल्प करणे बंधनकारक राहील.

४४. जलतरण तलाव निर्माण केला जात असेल किंवा भविष्यात निर्माण केल्यास प्रशिक्षित जीवर रक्षक नेमणे बंधनकारक राहील.

४५. गटाराचे व पावसाच्या पाण्याचा निचरा होणेकरीता नगरपरिषदेच्या गटारास जोडणेसाठी पक्क्या स्वरुपाची गटारे बांधावीत व भूखंडासमोरील रस्ता पक्क्या स्वरुपात गटारासह तयार केल्याखेरीज वापर परवाना मिळणार नाही.

४६. इमारतीच्या टॉलेटमध्ये लो वॉल्यूम फ्लॅश सिस्टमचा वापर करण्यात यावा.

४७. इमारतीचे बांधकाम करण्याचे कामगारांसाठी स्वच्छतागृहाची (Toilet) व्यवस्था करण्याची जबावदारी विकासकाची राहील. कामगारांनी आजूबाजूचा परिसर अस्वच्छ केल्यास, इमारतीच्या बांधकामाविरुध्द कार्यवाही करण्याची अधिकार नगरपरिषदेस असतील.

४८. सदनिकांची विक्री महा रेरा कायद्यानुसर कार्पेट क्षेत्रावर करण्यात यावी.

४९. आजूबाजूच्या भूधारकांचे सुविधाधिकार बाधित होऊ नयेत.

५०. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे जा.क्र.MFS/51/2021/394 Dt.04/09/2021 रोजीचे सुधारीत तात्पुरत्या ना हरकत दाखल्यातील अटी व शर्तीचे पालन करणे विकासक / वास्तुविशारद यांचेवर बंधनकारक राहील.

अंबरनाथ नगरपालिका अंबरनाथ

**सहाय्यक नगर रचनाकार**
**अंबरनाथ नगरपरिषद,अंबरनाथ**

**मुख्य अधिकारी तथा नियोजन प्राधिकारी**
**अंबरनाथ नगरपरिषद,अंबरनाथ**

प्रत : मा.तहसिलदार, अंबरनाथ यांना महाराष्ट्र शासन राजपत्र, महसूल व वन विभाग दिनांक ५ जानेवारी, २०१७ नुसार कार्यवाही करीता.